# सांगली जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितींचा परिचय

**डॉ. शहाजीराव धोंडीराम वारके** सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, कर्मवीर हिरे महाविद्यालय, श्री मौनी विद्यापीठ, गारगोटी

---

**प्रास्ताविक:**

भारतातील बाजार नियंत्रणास ऐतिहासिक पार्श्वभूमी असून पंचवार्षिक योजनेमध्येसुद्धा देशभरातील बाजार नियंत्रणाची गरज ओळखली गेली आहे. १९५६ मध्ये राज्यपूर्नरचनेनंतर वेगवेगळ्या राज्यांमध्ये वेगवेगळे एकापेक्षा जास्त कायदे लागू झाले. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर राज्यातील वेगवेगळ्या मार्केट कायद्यांचे एकत्रिकरण करुन सर्व राज्याकरिता एकत्र विधेयक १९६३ मध्ये प्रसिद्ध करण्यात आले. त्याची अंमलबजावणी २५ मे १९६७ पासून सुरु झाली. ह्या कायद्यात व नियमात वेळोवेळी परिस्थितीनुरुप सुधारणा करण्यात आल्या. सदर कायद्यानुसार बाजार समित्यांवर देखरेख व नियंत्रण ठेवून कायदा व नियमांच्या अंमलबजावणीची जबाबदारी सहकार खात्यांतर्गत कृषी पणन संचालनालयाकडे सोपविण्यात आली आहे. महाराष्ट्रात एकूण २९५ बाजार समित्या कार्यरत असून ६०८ उपबाजार या बाजार समित्यांशी संलग्न आहेत. अलिकडेच महाराष्ट्र शासनाने भारत सरकारच्या शिफारशीनुसार मॉडेल ॲक्टची अंमलबजावणी करुन कायद्यात सुधारणा केली आहे. या बदलांमुळे सध्याच्या बाजार समितींना शेतमालाच्या खरेदी विक्रीच्या नियमनाबरोबरच बाजारपेठेचा विकास करणे आवश्यक झाले आहे. भविष्यात थेट पणन, खाजगी बाजार व कंत्राटी शेती पद्धत या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी व्यावसायिक दूरदृष्टी ठेवून वाटचाल करावी लागणार आहे.

बाजारपेठांमध्ये मुलभूत सुविधांची गरज पूर्ण करण्यासाठी, शेतमालाची योग्य प्रतवारी व साठवणूक व्यवस्था करण्यासाठी, बाजारपेठेतील वाद सोडविण्यासाठी तसेच शेतकऱ्याला व बाजारपेठेशी सर्व संबंधित घटकांना बाजार समितीवर योग्य प्रतिनिधीत्व असावे याच उद्देशाने व हेतूने वेगवेगळ्या राज्यात शेतमालाच्या बाजार नियंत्रणाचे कायदे केलेले आहेत. भारतीय घटनेने केंद्र आणि राज्यामध्ये अधिकारांची विभागणी केली असून, कृषि बाजार विकासाचे अधिकार राज्यांना दिले आहेत.

सांगली जिल्हा हा महाराष्ट्रातील दक्षिण महाराष्ट्रात सह्याद्रीला लागून आहे. सांगली जिल्ह्यातील निम्मा भाग नदीकाठचा संपन्न भाग असून निम्मा जिल्हा अवर्षण प्रवन दुष्काळी भाग आहे. येथील शेतकरी अत्यंत कष्टाळू आणि प्रयोगशिल आहे. हळद, ऊस, मिरची, ज्वारी, मक्का, भात, गहू, भुईमूग, तंबाखू ही प्रमुख पीके घेतली जातात. द्राक्ष बागा व फुल शेतीसाठी सांगली जिल्हा प्रसिद्ध आहे. येथील शेतकऱ्यांनी सहकार व शेती यांची सांगड घालून कृषि क्षेत्रात नावलौकिक मिळविला आहे. सांगली जिल्ह्याने द्राक्षे व हळद यासाठी प्रसिद्धी मिळविली असून चांगली बाजारपेठ निर्माण केली आहे. साखर निर्मिती, दुग्ध उत्पादन, भाजीपाला उत्पादन, बेदाणा निर्मिती व फुले निर्यातीत प्रगती केली आहे.

सांगली जिल्ह्यात खेडेगावांमध्ये आठवडा बाजार भरतात. तेथे शेतकऱ्यांकडून व व्यापाऱ्यांकडून ग्राहकाला आवश्यक तो माल खरेदी करता येतो. जिल्ह्यात एकूण ६ बाजार समित्या कृषि पणन क्षेत्रात कार्यरत असून मुख्य बाजार व उपबाजार आवारामार्फत शेतीमालाची खरेदी विक्री व्यवस्था केलेली आहे. जिल्ह्यात सांगली, इस्लामपूर, तासगांव, पलूस, विटा व आटपाडी या सहा नियंत्रित बाजारपेठा आहेत. बाजार समितींनी आपल्या कार्यक्षेत्रातील शेतीमालाचे नियमन केले आहे. शेतीमालाच्या खरेदी विक्रीसाठी आवश्यकतेनुसार सोयी सुविधा उपलब्ध केल्या आहेत. आपआपल्या कार्यक्षेत्रात उत्पादित होणाऱ्या विशिष्ट शेतीमालाच्या बाजारपेठा म्हणून बाजार समितींनी लौकिक प्राप्त केला आहे. जिल्ह्याच्या कृषि पणन व्यवस्थेत बाजार समितींचे कार्य व योगदान महत्त्वाचे आहे.

**सांगली कृषि उत्पन्न बाजार समिती, सांगली :**

सांगली कृषी उत्पन्न बाजार समिती, सांगली ही बाजारपेठ एक अग्रगण्य बाजार समिती समजली जाते. विशेषत: हळदीच्या बाबतीत संपूर्ण भारतात अग्रेसर आहे. सांगली शहरात मुख्य मार्केट यार्ड असून मिरज, कवठेमहांकाळ व जत असे तीन तालुके बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात येतात. 'सांगली-मिरज-कुपवाड' या महापालिका क्षेत्रात बाजार समितीचे मुख्य मार्केट यार्ड आहे.

सांगली कृषी उत्पन्न बाजार समिती, सांगली या संस्थेची पायाभूत उभारणी स्व. वसंतरावदादा पाटील यांनी दूरदृष्टी ठेवून केल्याने त्यांच्याच कार्यपरंपरेत तयार झालेल्या नेतृत्वाने त्यांच्याच विचाराने या बाजार समितीची वाटचाल योग्य दिशेने केल्याने शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य बाजारभाव मिळण्यास मदत झालेली आहे. सांगली बाजार समिती आशिया खंडातील हळदीची अग्रेसर बाजारपेठ म्हणून प्रसिद्ध झाली आहे. शेतकऱ्यांच्या माल विक्रीसाठी सर्वसोयीनीयुक्त असे मुख्य मार्केट यार्ड असून मुख्य बाजार आवारासह सहा उपबाजार आवारात जनावरांचा बाजार भरतो. मुख्य बाजार आवारात शेतमाल साठविण्यासाठी गोदामांची सोय असून सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांसाठी सांस्कृतिक भवन बांधले आहे. सांगली जिल्ह्यात सांगलीवाडी व हरिपूर या ठिकाणी हळद साठवणुकीच्या दृष्टीने जमिनीखाली पेवे असलेने त्यामध्ये हळद साठविली जाते. ही नैसर्गिक सोय आहे. अशी वैशिष्ट्यपूर्ण सोय सांगलीस लाभलेने भारत सरकारने सांगली येथे हळद वायदे बाजाराचे केंद्र स्थापन केले आहे. बाजार आवारातील सर्व घटकांमध्ये सामंजस्य व समन्वय साधून ही बाजार समिती नियमनाचे काम करीत असलेमुळे दैनंदिन व्यवहार वाढत असून प्रगतीकडे वाटचाल करत आहे.

**कृषि उत्पन्न बाजार समिती, इस्लामपूर :**

कृषि उत्पन्न बाजार समिती, इस्लामपूर या समितीचे कार्यक्षेत्र संपूर्ण वाळवा व शिराळा तालुका असे दोन तालुक्यांचे आहे. बाजार समितीचे मुख्य बाजार आवार व प्रधान कार्यालय इस्लामपूर येथे असून ताकारी, शिराळा, आष्टा, कासेगाव या ठिकाणी उपबाजार आवार आहेत.

इस्लामपूर बाजार समिती अनेक उपक्रम राबवत असून समितीच्या उत्पन्नात वाढ होऊन यशस्वीपणे वाटचाल करत आहे. बाजार समिती स्वनिधी उभारून अनेक विकासकामे उभारत आहे. सोयाबीनच्या व्यापार उलाढालीत बाजार समितीने खरेदी केंद्रे स्थापन करून शेतकरी हिताचे कार्य चालविले आहे. बाजार समितीस मा. जयंतरावजी पाटील अर्थ व नियोजन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या रूपाने विधायक नेतृत्व मिळाले आहे.

**कृषी उत्पन्न बाजार समिती, तासगांव :**

कृषी उत्पन्न बाजार समिती, तासगाव या समितीचे बाजार क्षेत्र संपूर्ण तासगांव तालुका असून त्यामध्ये ६८ गावे समाविष्ट आहेत.तासगांव बाजार समितीने वेळोवेळी नियमित शेतीमालात वाढ करून बाजार पेठेच्या व्यापारात सतत वाढ केली आहे. तासगांव तालुक्यात ज्वारी, भुईमुग, तंबाखू,

गहू, हरभरा, ऊस, हळद, द्राक्षे, डाळींब ही पिके घेतली जातात. त्याचप्रमाणे फुले व भाजीपाला उत्पादनात हा तालुका अग्रेसर असून तासगांव तालुका द्राक्षासाठी प्रसिद्ध आहे.

तासगाव तालुक्यात जलसिंचन योजनांमुळे द्राक्ष बागा, ऊस, फुले व भाजीपाला यांचे उत्पन्न वाढलेले आहे. त्यामुळे बाजार समितीच्या उत्पन्नातही सातत्याने वाढ होत आहे. द्राक्षे व बेदाणा मार्केट म्हणून तासगांव बाजार पेठेने लौकीक मिळविला असून बाजार समितीमार्फत अद्ययावत निर्यात केंद्र उभारण्याचा समितीचा मानस आहे. बाजार आवारात व कार्यक्षेत्रात बेदाण्याच्या साठवणुकीसाठी अत्याधुनिक कोल्डस्टोरेज व्यवस्था आहे. बाजार समिती पूर्वी चिंचेची बाजारपेठ म्हणून प्रसिद्ध होती. सध्या ही हंगामामध्ये चिंचेचे सौदे येथे निघतात.

**कृषी उत्पन्न बाजार समिती, पलूस :**

कृषी उत्पन्न बाजार समिती पलूसचे कार्यक्षेत्र संपूर्ण पलूस तालुका असून त्यामध्ये तालुक्यातील ३४ गावांचा समावेश आहे. बाजार समितीची स्थापना दिनांक २४ ऑक्टोबर २००२ इ. रोजी झाली आहे.

पलूस बाजार समितीस महाराष्ट्रातील एक ज्येष्ठ नेते डॉ. पतंगराव कदम यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे. त्यांच्या सहकार्याने अस्तित्वात आलेल्या बाजार समितीच्या मुख्य बाजार आवारास 'मा. ना. डॉ. पतंगरावजी कदम बाजार आवार' असे संबोधले आहे.

पलूस कृषी उत्पन्न बाजार समिती नव्याने कार्यरत झाली असूनही शेतीमालाच्या विक्री व व्यवस्थापनासाठी बाजार समितीने बाजार आवारात सोयीसुविधा पुरविल्या असून बाजार समितीची वाटचाल कार्यक्षमपणे चालू आहे. बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात द्राक्षबागा व भाजीपाला, फुले यांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन आहे. भविष्यात द्राक्ष व फुले निर्यात, सुकामेवा बेदाणा सौदे व भाजीपाला आवक या क्षेत्रात समितीस व्यापक संधी उपलब्ध आहे.

**कृषी उत्पन्न बाजार समिती, विटा :**

कृषी उत्पन्न बाजार समिती विटाचे कार्यक्षेत्र खानापूर व कडेगांव तालुक्यांचे मिळून आहे. खानापूर व कडेगाव तालुक्यात पावसाचे प्रमाण कमी असल्याने शेतीमालाचे उत्पादन पावसाच्या नियमितपणावर अवलंबून आहे.

खानापूर तालुक्यामधील विटा येथे बाजार समितीचे मुख्य बाजार आवार आहे. त्याचे एकूण क्षेत्र ११ एकर २७ गुंठे एवढे आहे. यातील ४ एकर ३७ गुंठे क्षेत्र जनावरांच्या बाजारासाठी राखीव आहे. जनावरांचा बाजार मोठ्या प्रमाणात भरत असलेमुळे सदरचे क्षेत्र कमी पडत आहे. त्यासाठी बाजार समितीने विटा शहराच्या नवीन टाऊन प्लॅनिंगमध्ये १० एकर क्षेत्र राखून ठेवले आहे. ती जागा ताब्यात घेणे कामी संस्थेचे प्रयत्न चालू आहेत. कार्यक्षेत्रात दुष्काळ पडल्यास बाजार आवारात शासनामार्फत जनावरांसाठी चारा छावणी सुरु केली जाते.

कृषी उत्पन्न बाजार समिती विटा या समितीत शेतीमालाचा व्यापार कमी असल्याने समितीच्या उत्पन्नास मर्यादा आहेत. बाजार आवाराच्या विकासासाठी पणन मंडळामार्फत व शासनामार्फत सहकार्याची आवश्यकता आहे. विटा येथील जनावरांचा बाजार व भाजीपाला प्रसिद्ध आहे.

**कृषी उत्पन्न बाजार समिती, आटपाडी :**

कृषी उत्पन्न बाजार समिती, आटपाडी या समितीची स्थापना दिनांक २-११-१९७२ रोजी झाली. आटपाडी या ठिकाणी प्रमुख बाजार आवार व दिघंची, करगणी, खरसुंडी, झरे या ठिकाणी दुय्यम बाजार आवार आहेत.

आटपाडी तालुक्याचे नेते कै. श्रीमंत र. चि. ऊर्फ बाबासाहेब देशमुख यांच्या नेतृत्वाखाली कृषी उत्पन्न बाजार समिती, आटपाडीची स्थापना दि. २-११-१९७२ रोजी झाली. या बाजार समितीचे कार्यक्षेत्र संपूर्ण आटपाडी तालुका आहे.

आटपाडी बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात आटपाडी, खरसुंडी, करगणी येथे वार्षिक खिलार जनावरांच्या यात्रा भरतात. यात्रेमध्ये खिलार जनावरांची विक्री मोठ्या प्रमाणावर होते. आटपाडी तालुक्यामध्ये कापसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. येथे चांगल्या प्रतिचा कापूस मिळतो. कापसाची बाजारपेठ विकसित करणेचे प्रयत्न चालू आहेत. आटपाडी येथे शेळ्या मेंढ्यांचा आठवडा बाजार मोठ्या प्रमाणात भरतो. शेळ्या-मेंढ्यांची विक्री मोठ्या प्रमाणावर होते. तसेच तालुक्यात गणेश डाळींब व भगवा डाळींबाचे लागवड क्षेत्र मोठ्या प्रमाणावर आहे. तालुक्यातून डाळींब मोठ्या प्रमाणावर निर्यात केली जातात. डाळींबाची बाजारपेठ विकसित करणेचे प्रयत्न सुरू आहेत.

**समारोप:**

सांगली जिल्ह्यात दुष्काळी ६ तालुक्यांमुळे विकासात मर्यादा येत असल्या तरी नदीकाठच्या भागात ऊस, हळद, सोयाबीन तसेच द्राक्ष व डाळींब यांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. सांगलीची बाजारपेठ हळदीची व्यापारपेठ म्हणून प्रसिद्ध आहे. द्राक्षांचे उत्पादन व बेदाणा निर्मिती या क्षेत्रातही जिल्ह्याने प्रगती केली आहे.

सांगली जिल्ह्यात १० तालुके असून तीन उपविभाग प्रशासकीय सोयीनुसार निर्माण केले आहेत. सांगली जिल्ह्यात ६ बाजार समित्या कार्यरत आहेत.

सांगली जिल्ह्यातील बाजारपेठांची स्थापना राजकीय इच्छाशक्तीतून व नेतृत्वाच्या दूरदृष्टीने झाली आहे. स्थानिक बाजारपेठांचेच पुढे बाजार समितीत रुपांतर झाले असून त्यांचे नियमन सध्या कायदेशीरपणे होत आहे.

पुढील काळात बाजार समितींना खाजगी बाजार व्यवस्थेशी स्पर्धा करावी लागणार असल्याने सर्वच बाबतीत सुधारणांची आवश्यकता निर्माण झाली आहे. सध्याच्या कामकाजात अनेक बदल केले तरच बाजार समित्या स्पर्धेमध्ये टिकून राहतील. महाराष्ट्र शासनाने लागू केलेल्या सुधारणा कायद्यामुळे बाजार समितींना आपल्या कामकाजात स्पर्धात्मक बदल करणे तसेच बाजारपेठेचा विकास करणे अत्यावश्यक झाले आहे.

**संदर्भ सूची :**

१. प्रा. किल्लोळ, जगदीश, पृष्ठाधार साहित्य, धनंजयराव गाडगीळ सहकारी संस्था, नागपूर, मार्च २००२
२. व.शं. जोशी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) अधिनियम, १९६३ व नियम, १९६७, न्यायदिप प्रकाशन पुणे, २००३
३. सांगली जिल्हा कृषी पणन आराखडा
४. चोपडे, अमरजित, जिल्हा माहिती विशेषांक, आपला सांगली जिल्हा
५. मा. जिल्हा उपनिबंधक, सांगली जिल्हा कृषि पणन आराखडा
६. सचिव, सांगली कृषी उत्पन्न बाजार समिती, सांगली, वार्षिक प्रशासन अहवाल सन २००६-०७